REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2024

# मराठी भाषेचे जीवन व संस्कृतीतील महत्त्व

मृगया मोरे




आपण जेव्हा आपल्या देशातील भाषेचे महत्व या विषयी चर्चा करतो, तेव्हा आपणाला मराठी या भाषेची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहणे फार आवश्यक आहे. इ.स. 680 पासून मराठी भाषा अस्तित्वात आली होती. शिलालेख, ताम्रपटांच्या पुराव्यातून मराठीचे अस्तित्व सापडते. 10 व्या शतकात मराठी साहित्याचा प्रारंभ झाला. मुकुंदराजाने विवेकसिंधू हा मराठीतील पहिले काव्यग्रंथ रचला. ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरीचे लेखन शके 1212 मध्ये झाला. मराठी ही राज्यकारभाराची प्रथम भाषा म्हणून स्थान पूर्वीपासून आहे. हिंदी भाषेला राष्ट्रीय भाषा म्हणून स्थान मिळाले. प्रत्येक राज्यानुसार त्या - त्या राज्याची वेगळी मातृभाषा, बोलीभाषा आहे. कर्नाटकातील कन्नड तर महाराष्ट्रातील मराठी भाषा यांना प्रथम भाषा म्हणून स्थान मिळाले.

आज फार वेगाने जगाचे चित्र बदलत आहे. इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील प्रगतीमुळे मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात बदल झालेला आहे. नवीन यंत्र आणि तंत्राचे ज्ञान हे इंग्रजी मध्येच बंदिस्त झालेले आहे. म्हणून मराठी या भाषेचे स्थान फार धोक्यात आले आहे. यासाठी अनेक तज्ज्ञांनी मराठी या भाषेचे महत्व लोकांना पटवून दिले आहे. म्हणून शिक्षणाच्या सर्वच स्तरांवर विद्यार्थ्यांचे मातृभाषाच शिक्षणाचे माध्यम असावे असे तज्ज्ञांचे मत आहे. बालक ज्यावेळी जन्माला येते तेव्हा या हजारो वर्षाची सांस्कृतिक विकासाचा परिचय मातृभाषेमुळे होतो.

प्रथम भाषा मराठीचा दर्जा सर्व स्तरांवर उच्च राखण्यात आला. आधुनिक जगाबरोबर जावयाचे असेल तर इंग्रजी शिकणे फार आवश्यक आहे असे म्हटले जात होते. पण मराठी या विषयाला सुद्धा उच्च स्थान प्राप्त झालेले आहे. इंग्रजी बरोबर मराठी हे खांदयाला खंादा लावून उभा आहे.इंग्रजी विद्वानांनीच सर्वात प्रथम मराठी भाषेचा पद्धतशीर अभ्यास केला. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांची मातृभाषा मराठी आहे. तेंव्हा समाजात कामाच्या ठिकाणी वावरताना मराठी येणे गरजेचे असते. मराठी ही राज्यभाषा आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्यात राहणाऱ्यांनी मराठी भाषा शिकणे हे त्यांचे कर्तव्य आहे. न्यायालयीन क्षेत्रात मराठीचा वापर फक्त कनिष्ठ स्तरावरील न्यायालयात फार मर्यादित स्वरूपात केला जातो.

भारतासारख्या वैविध्यपूर्ण जाती जमाती मध्येही त्याने आपला ठसा उमटवण्यास सुरूवात केली. सर्व जाती धर्माचे लोक आता आपल्या मातृभाषेत काम करू लागले. यात महाराष्ट्राची मायमराठीही मागे नाही. संगणक म्हटला की, इंग्रजी हे आलेच पाहिजे असे समीकरण मोडीत निघण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सध्या बाजारात ऑपरेटिंग सिस्टिम आहे, तर दैनंदिन वापरातील वर्ड ,एक्सेल, पॉवरपॉईट सारखी सॉफटवेअर सुद्धा मराठी करण्याचा प्रयत्न झाला व त्यात यशस्वी प्रयोगही झाले आहेत. औदयोगिक क्षेत्रात , शासकीय यंत्रणेत टंकलेखन यंत्राची जागा आता संगणकाने घेतल्याने मराठीचा सर्रास वापर रोजच्या व्यवहारात संगणकावर होऊ लागला आहे.गल्लीबोळात आज मराठी छपाईसाठी आवश्यक असे तंत्रज्ञान सहज उपलब्ध झाल्याने लोकांना तो रोजच्या जीवनाचा अविभाज्य घटक वाटत आहे.

मराठीत सकाळ या सारखे वृत्तपत्र आज ई- सकाळ या नावाने आघाडीवर आहे. त्यामुळे जगातील कुठलाही मराठी माणूस महाराष्ट्रातील साऱ्या घडामोडींची माहिती घेऊ लागला आहे. इंटरनेटसारखे माध्यमही मराठी भाषेचा अनादर करू शकले नाही ते केवळ या संगणकीय भाषेच्या तांत्रिक निर्मितीतील चोखपणामुळे. तंत्रज्ञानाची मुळाक्षरे ही मराठी येऊ घेतल्याने आज बँकिंग क्षेत्रात एटीएम सारखी यंत्रे मराठीतून पैशांची व व्यवहाराची देवाण - घेवाण करताना आढळतात. मोबाईल हं ॅडसेटच्या विविध कंपन्यानी या तंत्रज्ञानासाठी सी - डॅकशी करार केल्याबाबत पत्रकात म्हटले आहे.

विद्यार्थी मातृभाषेच्या आधारे विषयज्ञान भरपूर वाढवू शकतो, भरपूर वाचन करू शकतो, विविध संकल्पना समजावून घेऊ शकतो, यातुन विद्यार्थ्यांना आत्मविश्वास प्राप्त होतो. वयाच्या पंधरा - सोळा वर्षापर्यंत मातृभाषेच्या माध्यमातून वैचारिक बैठक एकदा का व्यवस्थित तयार झाली की, आकलन, प्रकटीकरण, परिपक्वता यांच्या आधारे अन्य भाषेतून विविध विषयांचा अभ्यास चांगल्या प्रकारे विद्यार्थी करू शकतात. महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा अभ्यास करताना इतर माध्यमांच्या वापरासाठी मातृभाषेचा माध्यम म्हणून उपयोग चांगला आधार ठरतो. मुलांमध्ये सुसंस्कार घडविण्यात मातृभाषेसारखे दुसरे माध्यम नाही. मातृभाषेच्या शिक्षणातून संस्कारीत मने तयार होतात. एकूणच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याला मातृभाषा समर्थ असते. मायबोलीचे माता व मातृभूमीप्रमाणेच गैरवाचे स्थान जन्माला आलेल्या प्रत्येक मुलांचे पोषण मातेच्या दूधावर होते. मुलांच्या मुखातून पहिला शब्द बाहेर पडतो तो मातृभाषेतूनच। अंतःकरणातील भावनांचा प्रामाणिक उद्रेक मातृभाषेतूनच प्रकट होतो , म्हणून मातृभाषेला ह्दयांची भाषा म्हणतात. कोलरीज कवी म्हणतात Mother tongue is the language of heart . माणसांतील ह्दय संवाद मातृभाषेतूनच चालतो . म्हणूनच कवी हरिश्चंद्रांनीम्हटले आहे,

निज भाषा उन्नते आहे सब उन्नति को मू ुल।
बिन निजभाषा ज्ञान के मिटे न हियको शूल॥

मातृभाषेची श्रवण , लेखन , वाचन ही उद्दिष्टेये मातृभाषेच्या अभ्यासाने सफल होतात. भावनात्मक समरसता , चर्चा , कौशल्य , भाषण इत्यादी गुणांचामातृभाषेतूनविकास होतो. मातृभाषेद्वारे मनुष्य आपले विचार , भावना , इच्छा , आकांक्षा , सुखदुःख समजून घेऊ शकतो.

मानवी जीवन जसजसे उत्क्रं ात होत गेले तसतशी व्यक्तीव्यक्तींमधील देवाणघेवाण सुरू झाली ही देवाणघेवाण करण्यासाठी भाषेचा उपयोग केला जाऊ लागला. भाष हा जीवनातील महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेचे प्रतीकही भाषाच ठरत आहे. भाषेचे सौंदर्य आणि सामर्थ्य तिच्या मागे असलेल्या विचारात असते. विचारांच्या अभिव्यक्तीचे एक साधन म्हणजे भाषा होय. भाषा शिक्षणातील विकास घडवून आणणाऱ्या चार क्षमता आहेत. त्यामधील दोन क्षमता ग्रहणात्मक आहेत तर दोन क्षमता या प्रकटीकरणात्मक आहेत. ऐकणे, बोलणे , वाचणे आणि लिहण हा भाषा विकासाचा क्रम आहे. श्रवण , भाषण , वाचन आणि लेखन या चार मूलभूतक्षमता आहेत. या चार क्षमतांपैकी अवघड आणि गुंतागं ुतीचीक्षमता म्हणजे लेखनक्षमता होय. लेखनक्षमतेचा जर विकास तरच माणसाचे व्यक्तिमत्त्व चांगल्याप्रकारे आकाराला येते.

**भाषा म्हणजे काय?- भाषा** या धातूचा अर्थ बोलणे असा होतो. भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ठ पद्धती, व्यवस्था. माणुस बोलतो म्हणजे काय करतो? विशिष्ठ प्रकारचे संवेदना व्यक्त करण्याची एक पद्धत रूढ झाली . तिला भाषा म्हटले गेले व ही रूढ झाली. या भाषाद्वारे मनुष्या-मनुष्यात सामाजिक जीवनात विचार- विकारसांच्या आत्मप्रगटीकरणाचे व्यवहार सुरू आले. तात्पर्य भाषा म्हणजे मनुष्याचे परस्पर विचार विनिमयासाठी प्रतिकात्मक ध्वनी समुहांचीरूढ केलेली सुसंगत व सर्वसामान्य व्यवस्था. **( कुंडले., म.बा., मराठी अध्यापन )**

भाषा म्हणजे सांकेतिक परंतु परंपरागत मौखिक प्रतिकांचा सामाजिक आंतर व्यवहाराकरिता उपयोगात येणारा आकृतीबंध होय. **(सराफ रा. सो. , भाषा, मातृभाषा, व परभाषा)**

**भाषेची लक्षणे :-प्रत्येक** भाषेत विशिष्ट ध्वनी असतात अभिव्यक्तिसाठी ध्वनीचा एकत्रित उपयोग केला जातो. मात्र ध्वनी समुहांचाआशय वा अर्थ परंपरेने ठरविला जातो. मराठीत आई हा शब्द आ व ई या दोन ध्वनींनी मिळून बनला आहे. अन्य ध्वनीच्या संयोगाने का बनला नाही याचे उत्तर नाही हीच बाब सर्व शब्दांच्या बाबतीत आहे. भाषिक ही अर्जित संपत्ती आहे. याचा अर्थ ती जन्मसिद्ध नसते तर ती शिकावी लागते. भाषा श्रवण करून शिकावी लागते. भाषा शिकण्यासाठी त्या भाषेचा उपयोग करणाऱ्याचे सातत्याने अनुकरण करावे लागते. याचा अर्थ प्रारंभिक भाषा सातत्याने कानावर पडणे आवश्यक असते. जर एखादयास जन्मापासून भाषा ऐकण्याची संधी मिळाली नाही तर व्यक्ती मुकी होईल. भाषा सातत्याने बदलत असते. पूर्वीची शब्दशैली बदलते. ज्ञानेश्वरीतील मराठी व सध्याची मराठी यात खुपच

अंतर आहे. भाषा काळाच्या ओघात जशी बदलते. मराठीत म्हटले जाते. की, दर कोसावर भाषा बदलते. **( दुनाखे., अ.रा., मराठी अध्यापन )**

**मराठी भाषेचे महत्व :-भाषा** म्हणजे मराठी भाषेला मिळालेला वरदानच होय. आपल्या दैनंदिन व्यवहाराचे प्रभावी माध्यम म्हणून भाषेचाच उपयोग करण्यात येतो. जर भाषा नसती तर हे व्यवहार सुलभ झाले नसते. आपले सर्व जीवन आणि त्या जीवनातील सर्व व्यवहार सर्वस्वी भाषेवर अवलंबून आहेत. मानवी भाषेचे महत्वाचे अंग म्हणून भाषेला खूप महत्व प्राप्त झाले आहे. भाषेच्या अंगभूत सामर्थ्यामुळे हे महत्व प्राप्त झाले आहे. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. अनेक व्यक्तिंशी परस्पर सतत संबंध येत असतात. हे संबंध टिकविण्यासाठी, वाढवण्यासाठी माणसाला भाषेचाच उपयोग करावा लागतो. **( कुंडले., म.बा., मराठी अध्यापन )**

मरियोच्या मते भाषेची कथा म्हणजे संस्कृतीची कथा होय. प्रत्येक भाषा हे सामाजिक धन असते. समाज भाषेला समृद्ध करतो. संस्कृती याचा अर्थ मानवी जीवनाच्या सर्व अंगाचा एकमेकांवर प्रभाव पडून त्या समाजाला जे वैशिष्टय प्राप्त होते ते वैशिष्टय होय. संस्कृतित धार्मिक, नैतिक, आर्थिक, सामाजिक, तत्वज्ञान, कला, शिक्षण, परंपरा, चाली, पोशाख, अन्न, जीवनपद्धती या सर्वांचा समावेश होतो. ही संस्कृती भाषेमुळे टिकते व तिला स्थायित्व प्रात्प होते. बालक ज्यावेळी जन्माला येतो, तेव्हा या हजारो वर्षाच्या सांस्कृतिक विकासाशी त्याचा मातृभाषेमुळेपरिचय होतो. साहित्य, कला इ. जीवनातील सर्व बाबींचा वारसा मातृभाषेमुळे मिळतो. बालक एकाकी न राहता या सांस्कृतीक प्रवाहाचा एक भाग बनते. व्यक्तिच्या आपल्या मुलांशी मातृभाषेमुळेच संबंध येतो.माणसाला अन्न , वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा बरोबरच भाषा ही एक गरज बनली आहे. भाषेशिवाय माणुस जगूच शकत नाही. जन्मल्याबरोबर जी भाषा बोलली जाते. ती मातृभाषा होय. मातृभाषेतूनमुलांचीसामाजिक, शैक्षणिक वाढ होत असते. प्रथम बोलली जाणारी भाषा हळूहळू प्रौढ होत जाते. मुलांवरसंस्कार करते त्याला जीवन जगायला शिकवते. जीवनाचे तत्वज्ञान सांगते, विविध मार्गातून व्यक्तिची जडण- घडण होत असते.

संत ज्ञानेश्वर मराठी भाषेचा गौरव करताना म्हणतात की, अमृतालाही पेजेवर जिंकेल तसेच आरोपाचेही रूप दाखविण्याचे प्रचंड सामर्थ्य मराठी भाषेत आहे. म्हणूनच बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून संस्कृत मध्ये असलेले ज्ञान मराठी भाषेत लिहून सर्व सामान्यांसाठी ज्ञानाची द्वारे खुली केली. त्याच बरोबर संत एकनाथ मराठी भाषेचा गौरव करताना म्हणतात की, संस्कृत वाणी देवे केली, मराठी काय चोरापासून आली, अशा प्रकारचा खडा सवाल करून मराठी भाषा ही सर्व सामान्यांची भाषा आहे. सर्वांच्या जीव्हाळयाची भाषा आहे, असे तिचे मोठेपण वर्णिले आहे.

**मराठी भाषेचे जीवनातील स्थान :-**

**डेस्कार्टिस** नावाचा एक विचारवंत होवून गेला तो म्हणतो, I experience therefore I live आपल्या प्रत्येकाचे अस्तित्व मुळी आपण जीवनात असलेल्या अनुभवांवर अवलंबून आहे. जीवन म्हणजे अनुभव अशी जीवनाची साधी सुटसुटीत व्याख्या आपणास करता येईल. आपल्या प्रत्येकाच्या जीवनात अनुभवांना अनन्यसाधारण महत्व आहे. याचा विसर आपणास कधीच पडता कामा नये. जीवनात घेतलेले अनुभव आपण जतन करून ठेवू शकतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला हे अनुभव देवू शकतो. अनुभवांची देवाण-घेवाण करू शकतो. या अनुभवांच्या बळावर आपण पूर्वीच्या पिढीच्या खं ादयावर उभे राहून सारे आसमंत न्याहाळू शकतो. हे सारे अनुभव जतन करण्याचे प्रमुख साधन म्हणजे भाषा होय. आपल्याला भाषा येत राहीली नसती तर अनुभवाला काडीइतकी किंमत राहीली नसती माणसाली नेत्रदिपक प्रगती साधता आली ती केवळ प्राणी आपला विकास साधू शकले नाहीत. ध्वनी काय प्राण्यांनाही तोंडातून स्वरयंत्राच्या मदतीने काढता येतात. पण या ध्वनींना अर्थ लावून त्याचे सार्वत्रिक संकेत निर्माण करणे फक्त मानवाला बुद्धीमुळे जमले. माणसाला भाषा बोलता आली नसती, तर त्याचीही गत अन्य प्राण्यांसारखीच केविलवाणी झाली असती. (करंदीकर, प्रथम भाषा - प्रादेशिक भाषा )

**मातृभाषा आणि संस्कृती :- प्राचीन** काळापासून मानवाने आपली प्रगती करून घेण्यासाठी अविश्रांत प्रयत्न केले आहेत. एका पिढीने दुसऱ्या पिढीला ज्ञान दिले . हे ज्ञान देताना त्यात भर पडत गेली, जीवनात नवनवीन क्षेत्रे निर्माण झाली . नव्या वाटा सापडल्या, नवे रस्ते दृष्टीपथात आले. या सर्व प्रवासात मानवाला भाषेची फार मोठी मदत झाली. माणसाच्या अनुभवांचा साठा वाढत गेला, तसतसे माणसाने ज्ञानाचे वर्गीकरण केले. त्यातुन भाषा, धर्म , साहित्य, इतिहास, तत्वज्ञान, विज्ञान अशा विविध क्षेत्रांची निर्मिती झाली . त्यातुन संस्कृती प्रकट झाली. मानवाच्या सांस्कृतिक जीवनात भाषेचा सिहांचा वाटा आहे. महाराष्ट्रात हा सांस्कृतिक ठेवा आपणास मराठी भाषेतून प्राप्त

झाला आहे. महाराष्ट्रात संतानी आणि विचारवंतानी जे साहित्य निर्माण केले, त्यातून विचारांचा आचाराचा आणि जीवनमुल्यांचा सांस्कृतीक वारसा त्यातून आपणास मिळाला. या वारशातून नव्या पिढीची जडण - घडण झाली.

### संदर्भग्रंथसूची


1. करंदीकर सुरेश. (1996). मराठी अध्यापन पध्दती. कोल्हापूर : फडके प्रकाशन.
2. करंदीकर , मंगरूळकर (1994), प्रथम भाषा - प्रादेशिक भाषा मराठी. कोल्हापूर : फडके प्रकाशन.
3. कुंडले म.बा. (1991). मराठीचे अध्यापन. पुणे : श्री विद्या प्रकाशन.
4. दुनाखे अरविंद. (2007). मराठीचे आशययुक्त अध्यापन. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.